**<u>सरतपास शपथेवर पुन्हा सुरू:-</u>**

मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१६५ वर दाखल केले असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझा अंगठा आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२१ ते ४० तर्फे :-</u>**

**<u>वि. अधिवक्ता यांनी उलटतपास घेणार नसल्याचे प्रतिपादन केले.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते १८ तर्फे</u>**

**<u>प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे वि. अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादी क्र.१ ते १८ तर्फे उलटतपास नाही.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१९ तर्फे ॲड. एस. के. राणे:-</u>**

२. न्यायालयात यावयाचे आहे याबाबत मला माझ्या मुलाने सांगितले. माझे शिक्षण झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे शिक्षण झालेले नसुन मी प्रतिज्ञापत्रावर अंगठा केल्याने मला प्रतिज्ञापत्रातील मजकुर माहीत नाही. प्रतिज्ञापत्रातील मजकुर सांगायला मी वकीलांच्या ऑफीसला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, वकीलांनी माझे प्रतिज्ञापत्र तयार करून ठेवले होते. माझे प्रतिज्ञापत्र १०.०० वाजता तयार केले. वादी क्र.४ हा माझा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.४ यांनी सर्व माहिती वकीलांना सांगितली. सर्व्हे क्र.८२/२ चे क्षेत्र किती आहे हे मला माहीत नाही. सर्व्हे क्र.८२/२ च्या पुर्वेला बाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा केसमध्ये असल्याने मला केसबाबत माहीत आहे. कुठल्या एजंटबरोबर भांडण झाले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी एजंटचे

नाव सांगितलेले नसुन मारामारीच्या केसचे काय झाले हे मला माहीत नाही. ती केस चालु होती. बल्लाळ जोशी सावकाराने काय पेपर लिहुन दिले हे मला माहीत नाही. साक्षीदार स्वत: सांगतो की, जमीन गावाला दिली होती. गावाला सर्व्हे क्र.९२ बागाचा तुकडा दिला. हे म्हणणे खरे आहे की, दत्तात्रय बाळु पाटील हे आमच्या गावचे पुढारी आहेत व तुकाराम दत्तात्रय पाटील हा त्यांचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुर्वी पुढारी गावात न्याय करायचे. हे म्हणणे खरे आहे की, दत्तात्रय बाळु पाटील हे जिल्हा परिषदेचे सदस्य होते. मी हनुमान मंदिरात भरविलेल्या मिटींगला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रभाकर जाधव हे मोह गावाच्या पाडयात राहतात. मोहच्या गावाच्या पाडयातील लोकांनी पुर्वी एक दावा क्र.२८३/२००७ दाखल केला होता त्याबाबत मला माहिती नाही. त्यांच्यातील वाद मिटल्याने तो दावा मागे घेण्यात आला त्याबाबत मला माहिती नाही. मला प्रस्तुतच्या दाव्यात पक्षकार करावे यासाठी मी अर्ज केला नाही. माझा मुलगा प्रस्तुत दाव्यात पक्षकार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुलाने केलेल्या दाव्यास मान्यता देण्यासाठी मी आलो आहे. सन २००० पुर्वी मी माझे बैल विकले. मी थोडी शेती लावतो. हे म्हणणे खरे नाही की, आता बकऱ्या राहिल्या नाहीत. बल्लाळ जोशी यांनी काय पेपर लिहुन दिले ते मी मुलासमक्ष वाचुन घेतलेले नाहीत. सदरहू जमीन आमच्या गावचे पुढारी दत्तात्रय पाटील व बाकीच्या पंचांनी गावाच्या भल्यासाठी गावकीची सभा घेऊन विक्री केली हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा दाव्यात पक्षकार असुन मी मुलाला मदत करण्यासाठी साक्ष देण्यासाठी आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर मला माहीत नसुन मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

प्रतिवादी क्र.२० व त्यांचे वि. अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादी क्र.२० तर्फे उलटतपास नाही.

प्रतिवादी क्र.४१ ते ४८ व त्यांचे वि. अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादी क्र.४१ ते ४८ तर्फे उलटतपास नाही.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल

पनवेल
दिनांक : १०/०३/२०२६.